P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad,
Maharashtra - 411033

## प्रेसनोट दिनांक - ०२/०२/२०२४

### दि. ०१/०२/२०२४ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चिखली ६०/२०२४ भा.दं.वि कलम ३०७,३२३,५०४,५०६,३४ सह क्रिमीनील लॉ अमेडमेन्ट ॲक्ट कलम ७, भारतीय हत्यार बंदी कायदा कलम ४(२५), महाराष्ट्र पोलिस अधिनियम कलम ३७(१)(३)सह १३५प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि ३१/०१/२०२४ रोजी सांयकाळी १७/३०वाजताचे सुमारास चिंचेचा मळा म्हेत्रेवस्ती चिखली पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि ०१/०२/२०२३ रोजी २३/५३ वाजता. |
| फिर्यादी | :- | दानीश वाजीद शेख वय २४वर्ष धंदा-नोकरी रा.त्रिवेणीनगर चौक,नॅशनल गॅरेज समोर,श्री स्वामी विवेनाकंद शाळेसमोर, निगडी पुणे, ८८८८०९४८७६ |
| आरोपी | :- | १)निलेश रेणवा रा.टॉवर लाईन म्हेत्रेवस्ती चिखली पुणे व<br>२) त्यांचे दोन साथीदार **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांनी दोन महीन्यापुर्वी आरोपी नामे निलेश रेणवा यांचे भाउु दिनेश रेणवा यास शिवीगाळ केली होती त्याचा मनात राग धरुन आरोपी निलेश रेणवा व त्याचे दोन साथीदार यांनी मिळुन फिर्यादी यांचे मित्र अमित सिंग यास शिवीगाळ करुन हाताने मारहाण करु लागले त्यावेळी फिर्यादी हे त्यांना समजाविण्यासाठी गेले असता आरोपी निलेश रेणवा यांने त्याचे जवळील लोखंडी कोयता काढुन फिर्यादी यांना तुला ठेवतच नाही, तुला लय माज आला आहे असे म्हणुन फिर्यादीस जिवे ठार मारण्याचे उददेशाने त्यांचे जवळील लोखंडी कोयता काढुन तो फिर्यादीचे डोक्यात मारुन गंभीर जखमी केले म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि बाबर ९९०२८५७५५९ |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | पिंपरी ७४ /२०२४ भा.द.वि कलम ३९२, ५०४, ५०६, ३४, भारतीय हत्यार कायदा कलम ४, २५ व महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१) सह १३५, क्रिमिनल लॉ अमेंडमेंड ॲक्ट कलम ३ व ७ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि ३१/०१/२०२४ रोजी ०४.३० वा.चे सुमारास पिंपरी ब्रीज खाली, भाजी मंडईचे शेजारी, पिंपरी, पुणे येथे सार्वजनिक ठिकाणी |
| गुन्हा दाखल | :- | दि ०१/०२/२०२४ रोजी १९/३१ वा. |
| फिर्यादी | :- | हिरालाल श्रीमिसरी मंडल, वय ३२ वर्षे, धंदा मजुरी, रा. महिंद्रा ॲंथीया सोसायटीचे समोर, मटण दुकानाचे बाजूला, गांधीनगर, पिंपरी, पुणे. |
| आरोपी | :- | १) लड्डुया बहोत, वय अंदाजे २० वर्षे, रा. सेनेट्री चाळ, पिंपरी, पुणे.<br>२) राहूल्या लखन, वय अंदाजे २५ वर्षे, रा. सदर. (दोघांची पुर्ण नावे माहित नाही) **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी हे नेहमीप्रमाणे हमाली काम करीत असताना, नमुद आरोपी यांनी तेथे येऊन फिर्यादीस पकडून आरोपी क्रं. २ याने फिर्यादीस, अश्लील शिवीगाळ करुन मारण्याची भिती दाखवून,फिर्यादीचे पॅंटचे खिशातील ९५०/- रूपये जबरीने काढून घेतल्यावर, आरोपी क्रं. २ याने कोयता फिर्यादीचे दिशेने रोखून किसी को कुछ बोला तो याद रख, अशी धमकी दिली, तसेच फिर्यादीचा आरडा ओरडा ऐकूण जमा झालेल्या लोकांचे समोर आरोपी क्रं. २ याने कोयता हवेत फिरवून, कोई बीच में आया तो काट डालुंगा, असे बोलून दहशत निर्माण केली आहे. |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि देशमुख ९८५०९७६६४२ |

०३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | भोसरी ६७/२०२४ भा.द.वि. कलम ३७९, ४२७, विद्युत कायदा २००३ चेकलम १३६ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि०१/०२/२०२३ रोजी रात्री१२/३० ते सकाळी ०८/३० वा चेदरम्यान  काटे बंगल्याजवळ, काटे खडीमशिन, पुणे-नाशिक हायवे रोडजवळ, भोसरी, पुणे. |
| गुन्हा दाखल | :- | दि.०१/०२/२०२४   रोजी १८/५६ वा. |
| फिर्यादी | :- | फुलचंद मुंजाजी पाचांगे, वय-४३ वर्षे, धंदा- नोकरी (टेक्नीशियन) रा. स.नं. ११७, गोडावुनचौक, मोहननगर, भोसरी, पुणे. |
| आरोपी | :- | अज्ञात ईसम |
| तपशिल | :- | नमुद ता. वेळ व ठिकाणी यांतीलट्रान्सफॉर्मरमधील कॉपरची पट्टी व ट्रान्सफॉर्मरचे ऑईल येथील महावितरणाचे ट्रांन्सफॉर्मरचे कश्याचेतरी साह्याने तोडफोड करुन सदर ट्रान्सफॉर्मर मधील ७९,०००/- रू किमतीची कॉपरची पट्टी व आईल कोणीतरी अज्ञात चोरटयाने लबाडीच्या इरादयाने फिर्यादीचे संमती शिवाय चोरुन नेले आहे. |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोहवा पाटील ९९२३८०७१३५ |

०४

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | सांगवी ३२/२०२४, भा.दं.वि.कलम ३०६,४९८ (अ),३२३,३४ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि ०१/०२/२०२४ रोजी १२/३० ते १४/०० वाजता .फ्लॅट नंबर १०३, मुद्रा हाईटस्, पंचशिलनगर, पिंपळे निलख, पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि ०१/०२/२०२४  रोजी    २१/२५  वाजता |
| फिर्यादी | :- | खंडु उत्तम जाधव वय ४९ वर्षे,धंदा - वराहपालन व्यवसाय, रा. सर्व्हे नं.८/४, शिवतीर्थनगर, थेरगाव,पुणे-३३, |
| आरोपी | :- | १)सासु  २) परशुराम दिनकर माने (सासरे ) रा सर्व्हे नं.८/४, शिवतीर्थनगर, थेरगाव,पुणे-३३, ३) किरण परशुराम माने (पती ) रा.सदर ४) ननंद **आरोपी क्र १ ते ३ अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांची मुलगी वय-२६ वर्षे, रा.फ्लॅट नंबर १०३, मुद्रा हाईटस्, पंचशिलनगर, पिंपळे निलख, पुणे हीस तिची सासु सासरे, पती व नंनद आरोपी क्र १ ते ४ यांनी संगणमत करुन गायत्री हिने माहेरहुन नविन फ्लॅट खरेदी करण्यासाठी दोन लाख रुपये आणले नाही म्हणुन वारंवार शारीरीक, मानसिक व आर्थीक छळ करुन चारित्र्यावर संशय घेवुन अपमानित करुन क्रुरपणे व हिनतेची वागणुक दिली म्हणुन फिर्यादी यांची मुलगी हिने दिनांक ०१/०२/२०२४ रोजी राहते घरी बेडरुम मध्ये सिलींग फॅनला साडीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्त्या करण्यास प्रवृत्त केले आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि खलाटे ९५५२५३३५११ |

०५

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | दिघी ४८/२०२४ भा.द.वि कलम  ३२६,३२३, ५०४,४२७ महा.पोलीस अधिनियम कलम ३७ (१)(३)सह १३५ प्रमाणे. |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि ३०/०१/२०२४ रोजी रात्रौ १०/३० वा. चे सुमारास  ए आय टी कॉलेज चे पुढे अंदाजे १०० मी. अंतरावर दिघ्ी आळंदी रोड पुणे येथे सार्वजनिक रोड चे बाजुला |
| गुन्हा दाखल | :- | दि ०१/०२/२०२४ रोजी  १४  / ४८ वा. |
| फिर्यादी | :- | बालाजी गुरुनाथ स्वामी वय २६ वर्षे धंदा  नोकरी रा. साईपार्क, साईसिध्द कॉलनी एचपी पेट्रोलपंपाचे जवळ, दिघी पुणे |
| आरोपी | :- | अनोळखी तीन तृतीय पंथीय इसम |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी  फिर्यादी व त्यांचा मित्र शिवराज खराबे यांचा कॉमन मित्र अंतरीक्ष रा. कळस याला भेटणेसाठी दिघी गावाकडुन कळस गावाकडे जात असताना ए आय टी कॉलेज चे पुढे अंदाजे १०० मी. अंतरावर दिघ्ी आळंदी रोड पुणे येथे सार्वजनिक रोड चे बाजुला लघवी करण्याचे कारणावरुन फिर्यादी यांना |

वरिल तृतीय पंथील लोकांनी शिवीगाळ करुन त्यापैकी दोघांनी फिर्यादी यांना पकडुन एकाने त्याचेकडील चाकु काढुन फिर्यादी यांचे मानेवर व डोक्यावर वार करुन त्यांना गंभीर जखमी केले आहे. व फिर्यादी यांचे करिज्मा मो.सायकल चे तोडफोड करुन नुकसान केले म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि रणवरे ९५५२५५०३१४

०६

पोस्टे व गु रजि.नं. :- देहुरोड ५५/२०२४, भादवी २७९, ४२७, ३३७ सह मो.वा.का. कलम १८४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि ३१/०१/२०२४ रोजी मुंबई तुन सोलापुर कडे जातांना साधारण रात्रौ १०/४० वा सुमारास कार देहुरोड एफ.ए.डी. मीलीटरीचे गेटवर मुंबई ते पुणे जाणारे सार्वजनीक रोडवर

गुन्हा दाखल :- दि ०१/०२/२०२४ रोजी ०४.४४ वा

फिर्यादी :- जैद इम्तयाज कुमठे वय.२५ धंदा-एम.आर.रा.३१४ मुस्लीम पाच्छापेठ सोलापुर जि.सोलापुर

आरोपी :- माल वाहतुक टँकर नंबर एम.एच.४३/सी.ई.३२४३ वरील ड्रायवर धनराज दिगंबर जगदाळे

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे कारला नमुद टँकर वरील आरोपी याने पाठीमागील उजवे बाजुस व नंतर पुढील भागास धडक देवुन फिर्यादीचे कारचा पाठीमागील व पुढील संपुर्ण भागाचे नुकसान केले आहे व फिर्यादीचे कार मधील सर्वाना मुक्का मार लागला आहे.म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोहवा ठोकळे ७९७२४०१०४६

०७

पोस्टे व गु रजि.नं. :- देहुरोड ५६/२०२४, भा.द.वि कलम ४२०, भारतीय व्यापार चिन्ह अधिनीयम कायदा १९९९ चे कलम १०३,१०४ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि २३/०१/२०२४ रोजी १४.३० ते १६.३० च्या पुर्वी जुना मुंबई पुणे हायवे मामुर्डी ता. हवेली जि. पुणे

गुन्हा दाखल :- दि ०१/०२/२०२४ रोजी १९.५१वा

फिर्यादी :- कैलास सिताराम लहारे वय ४४ वर्षे व्यवसाय नोकरी जनरल मॅनेजर पध्दश्री डॉ विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखाना लिमिटेड प्रवरानगर तालुका राहता जि अहमदनगर सध्या राहणार वाकडी ता. राहता जि. अहमदनगर

आरोपी :- १) जुल्फिकार ताज अली चौधरी वय ६८ वर्षे रा मसुरी गाझियाबाद २०१३०२ उत्तरप्रदेश
२) अमित ठाकुर आहेर वय ३० वर्षे रा. बोरमाळ पारसवाडा पो. कोचाई ता. तलासरी जि. पालघर
३) असलम दौलत खान, ४) संजय भगोवती पांडेय **आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी नमुद आरोपी यांनी फिर्यादी नोकरीस असलेला कारखाना पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखाना लिमिटेड प्रवरानगर ता. राहता जि. अहमदनगर या कारखान्याचे अधिकृत रजिस्टर लेबल बनावट तयार करुन ते खरे भासवुन बनावट दारुच्या बाटलिवर चिटकवुन त्यांनी सदर साखर कारखान्यातील प्रवरा डिस्लरी विभागाची फसवणुक केली आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि जाधव ८१०८८५६५६५

०८

पोस्टे व गु रजि.नं. :- तळेगाव दाभाडे ५६/२०२४ भादवि कलम ४२०,४०६, १७०,३४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि ०१/०२/२०२४ रोजी सायंकाळी १८/१५ वा.चे सुमारास मी भिसे वृध्दाश्रमाचे गेटजवळ, मनोहर नगर कमानीसमोर तळेगाव चाकण रोड ता मावळ जि पुणे

गुन्हा दाखल :- दि ०१/०२/२०२४ वेळ २२/४९ वा.

फिर्यादी :- मोहन परशुराम बेंद्रीकर, वय ७१ वर्षे, धंदा-सेवानिवृत्ती, रा.साई रिजन्सी सत्यकमल कॉलनी, तळेगाव चाकण रोड, रॉयल इनफिल्ड शोरूमचे पाठीमागे, तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे

आरोपी :- अज्ञात दोन इसम

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी हे भिसे वृध्दाश्रमाचे गेटजवळ, मनोहर नगर कमानी समोर तळेगाव चाकण रोड येथे पायी जात असतांना अज्ञात दोन इसम यांनी फिर्यादी यांना पोलीस असल्याची बतावणी करून ४५,०००/-रु किंमतीचे २ तोळे वजनाची सोन्याची चैन व १०,०००/- रु किंमतीची सोन्याची अंगठी असे एकुण ५५,०००/- रु किंमतीचे सोन्याचे दागीने काढुन घेवुन निघुन गेले म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोहवा निळे ९८५०८२७१४४

०९

पोस्टे व गु रजि.नं. :- वाकड १०६/२०२४ भा.दं.वि.कलम ४१९, ४२०, ३४ सह माहीती तंत्रज्ञान अधिनियम (सुधारीत) कायदा २००८ चे कलम ६६ (डी)

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि २४/०१/२०२४ रोजी ते दिनांक ३०/०१/२०२४ रोजी दरम्यान फिर्यादी यांचे राहते घर गोविंद कलाटे यांचा फ्लॅट, फ्लॅट नं. ए-७०१ पालास प्लस सोसायटी, कस्पटे वस्ती वाकड पुणे याठिकाणी ऑनलाईन पद्धतीने.

गुन्हा दाखल :- दि ०१/०२/२०२४ रोजी १७.३७ वाजता

फिर्यादी :- कुमारजीत देबाशीश शर्मा वय- ३९ वर्षे, धंदा- सध्या काही नाही रा. गोविंद कलाटे यांचा फ्लॅट, फ्लॅट नं. ए-७०१ पालास प्लस सोसायटी, कस्पटे वस्ती वाकड पुणे मुळगांव मु पो जी-३, कृष्णा सोसायटी, सोनारी एअरपोर्टजवळ, सोनारी जमेशदपुर झारखंड

आरोपी :- १)मोबाईल ९७६९५५८११६ धारक,
२)Elite Trading, indusind bank 255639912569 3)Bindushree S, federal Bank 13340100331169 4) Vijaya sharma, Federal Bank 14510100093790 5)Karnal general store,
6)indusind bank 259351446536, 7)Nandkishor ICICI bank, 8)008605501559, Farul salim shaikh,
9)federal Bank 23640100005889 10)Prem enterprises, 11)indusind bank 259226198708 , 12)Mahadev fast food, indusind bank 259257635681 अकाऊंट धारक व रक्कमा पुढे जमा झालेले बँक खाते धारक तसेच गुन्हयाचे तपासात निष्पन्न होणा-या अज्ञात इसम

तपशिल :- नमुद तारीख वेळी व ठिकाणी ९७६९५५८११६ या मोबाईल नंबरवरुन फिर्यादी यांचे हाटसअॅप मोबा.नं. वर व्हाटसअॅप मेसेज आला की, पार्ट टाईम जॉब करणेकामी जॉब ऑफर देण्यात येईल. त्यांनी फिर्यादीला टेलीग्राम अप्लिकेशन घेण्यास सागितले. ते घेतल्यावर त्यांनी फिर्यादीला व्ही आय पी टास्क ग्रुप मध्ये अँड केले. फिर्यादीला ग्रुपवर लिंक वर क्लिक करुन रेटिंग्स देण्यास सांगितले. त्यांनी फिर्यादीला लिंक 1inchnetwork2024.net , 1inchnetwork156.net या पेज वर रेटिंग्स देण्यास सागुंन फिर्यादीला दिनांक २४/०१/२०२४ रोजी ते दिनांक ३०/०१/२०२४ रोजी दरम्यान वेळोवेळी त्यांचे दिलेल्या अकाउंट नंबर वर ३०,२०,३७०/-रु. रुपये पाठवायला सांगून ते परत न देता त्यांनी फिर्यादीची आर्थिक फसवणूक केली आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोनि साळुंखे ७७५८९२१२१४

१०.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | शिरगाव २४/२०२४ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५ (क) (फ) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि ०१/०२/२०२४ रोजी १३.०० वा.सु मौजे शिरगाव गावचे हददीत पवना नदीचे कडेला मोकळया जागेत ता.मावळ,जि.पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि ०१/०२/२०२४ रोजी १९.४९ वा |
| फिर्यादी | :- | शुभम गणेश राजगुरे वय २८ वर्षे पो कॉ ब नं ३४६२ नेमणुक- शिरगांव परंदवडी पोलीस स्टेशन |
| आरोपी | :- | महीला आरोपी वय २१ वर्ष **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी नमुद आरोपी हिने बेकायदेशिरपणे हातभटटीची दारु तयार करण्याकरीता लावलेले गुळ मिश्रित कच्चे रसायण १२,०१,५००/ रुपये किमंतीचे साहित्य तिचेकडे मिळुन आल्याने तिला पकडण्याचा प्रयत्न केला असता ती पळुन गेली आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोहवा कवडे ९६०४७८७७०९ |

११.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | पिंपरी ७६ /२०२४, भांदवि कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि ०१/०२/२०२४ रोजी १६.१० वा. चे सुमारास काटे पिंपळे रोड, पिंपरी गाव, पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि ०१/०२/२०२४ रोजी २०/३९ वा. |
| फिर्यादी | :- | चंदनसिंग शिवराम महाजन, वय ४० वर्षे, धंदा नोकरी, रा. फ्लॅट नं. सी/१०३, मनोज्या रेसिडेन्सी, कोंढवे धावडे, ता. हवेली, जि. पुणे. |
| आरोपी | :- | १) नितेश प्रमोद रॉय, वय अंदाजे ३५ वर्षे, रा. नाशिक.<br>२) फत्ते अन्सारी, वय ३० वर्षे, (पुर्ण नाव पत्ता माहित नाही).<br>३) गिरीष संजय पाटील, वय २३ वर्षे, रा. स.नं. १२१/२, राजेवाडी नगर, राजवाडा लॉन, तापकिर मळा चौक, काळेवाडी, पिंपरी, पुणे. मुळ रा. मु.पो. वरसाडे माईजी, ता. पाचुरा, जि. जळगाव.<br>४) आकाश राजेंद्र जयस्वाल, वय अंदाजे ३० वर्षे, रा. (पुर्ण पत्ता माहित नाही).<br>५) सचिन आप्पा भोसले, वय अंदाजे २२ वर्षे, रा. (पुर्ण पत्ता माहित नाही).<br>६) फिरोज जमशेद खान, वय अंदाजे ३० वर्षे, रा. (पुर्ण पत्ता माहित नाही)<br>**आरोपी क्र ३ अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील आरोपी मजकुर यांनी आपसात संगनमत करून त्यांचे नावाचे आधारकार्ड, शॉप ॲक्ट लायसन्स व लीव्ह अँड लायसन्सचे ॲग्रीमेंट अशी बनावट कागदपत्रे बनवून, ती कागदपत्रे वाहने खरेदी करण्यासाठी सादर करून, त्याव्दारे फिर्यादी यांचे टीव्हीएस क्रेडिट सर्विस लिमिटेड, तसेच मनबा फायनान्स लिमिटेड, बजाज फायनान्स व आयडीएफसी फर्स्ट बँक या फायनान्स कंपन्यांकडून लोन घेऊन, त्याव्दारे वाहने खरेदी करून, त्यापैकी काही वाहने स्वतःच्या आर्थिक फायद्याकरीता परस्पर कोणालातरी विक्री करून फिर्यादी यांचे कंपनीची, तसेच इतर फायनान्स कंपन्यांची फसवणूक केली आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि रायकर ७५८८६०३९३४ |

१२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड १०५/२०२४, भा.दं.वि.कलम ४१९, ४२०, ३४ सह माहीती तंत्रज्ञान अधिनियम (सुधारीत) कायदा २००८ चे कलम ६६ (डी) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि १०/१२/२०२३ रोजी ते दिनांक १३/१२/२०२३ रोजी दरम्यान फिर्यादी यांचे राहते घर थेरगाव पुणे. याठिकाणी ऑनलाईन पध्दतीने. |

| | | |
|---|---|---|
| गुन्हा दाखल | :- | दि ०१/०२/२०२४ रोजी १५.१० वा |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | १)मोबाईल क्र. +62831615603825 धारक, २)PUNB Ac No 9306002100001549, ३)ICIC AC No 497805500012,४)9568039904@paytm, ५)Malatesha123@sbi, ६)Vinutha7691@ybl, ७)Mohitsaini9694652@ybl, ८)Avinashkaki3@ybl, ९)avinashkaki5@ybl अकाऊंट धारक व रक्कमा पुढे जमा झालेले बँक खाते धारक तसेच गुन्हयाचे तपासात निष्पन्न होणा-या अज्ञात इसम |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी ६२८३१६१५६०३८२५ या मोबाईल नंबरवरुन फिर्यादी यांचे मोबाईल नंबर चे व्हाटसअॅप वर पार्ट जॉब करणेकामी जॉब ऑफर देण्यात येईल. त्यासाठी तुम्हाला टेलीग्राम अप्लिकेशन घ्यावे लागेल असा मेसेज पाठवून फिर्यादीला टेलीग्राम अॅप्लीकेशन घ्यायला सांगून त्यांनी फिर्यादीला व्ही आय पी टास्क ग्रुप मध्ये अँड केला. त्यानंतर त्यांनी ग्रुपवरील लिंक वर क्लिक करुन yellowpages.Com या लिंक पेज वर रेटिंग्स देण्यास सांगून त्यांनी फिर्यादीला वरील युपीआय नंबर व अकाऊंट नंबर देवून सांगेल त्याप्रमाणे पैसे सेंड करा. तुमचे टास्क पुर्ण झाल्यावर तुम्हाला २,८८,०००/- रुपये तुमचे खात्यावर जमा होतील असे सांगून त्यांनी फिर्यादीला १,१००/- रुपये पाठविण्यास सांगितले. त्याप्रमाणे फिर्यादी यांनी त्यांना त्यांनी दिलेल्या युपीआय आय डी वर फिर्यादीचे बॅक ऑफ इंडिया चे अकाउंट नंबर मधून पाठवले. त्यानंतर त्यांनी फिर्यादीला dhedsj.com https://www. dhedsj.com/ Loing/ index/ यापोर्टलवर वेबसाईट रजिस्टर करण्यास सागितले. व 18UAU7P200. हया वेबसाईट वर जाउन बीटीसी /युएस डी मध्ये पैसे गुतवण्यास सांगितले. फिर्यादी यांनी एकूण २,३९,०००/- रुपये पाठविले. त्यानंतर त्यांनी फिर्यादीला असे सांगितले की, तुमचा लॉस झाला आहे. तर तुम्ही आनखीन पैसे भरा. त्यावेळी फिर्यादी यांनी माझ्या कडे आता पैसे नाहीत. माझे पैसे मला परत करा असे म्हणाले असता त्यांनी फिर्यादीचे पैसे परत करण्यास नकार देवून फिर्यादीची एकूण २,३९,०००/- रुपयेची फसवणूक केली आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोनि साळुंखे ७७५८९२१२१४ |